# केजरीवाल, बेदी, प्रशांत भूषण यांना...

नवी दिल्ली - अरविंद केजरीवाल, किरण बेदी आणि प्रशांत भूषण यांना कोअर कमिटीतून वगळण्याचा अण्णांनी विचार केला होता, असे वादग्रस्त वक्तव्य अण्णा हजारे यांचा व्यक्तिगत ब्लॉग सांभाळणारे लेखक, पत्रकार राजू परुळेकर यांनी केल्यानंतर टीम अण्णावर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे.

शुक्रवारी अण्णांनी दिल्लीत मौनव्रत सोडल्यानंतर पत्रकारांनी, तुम्हाला कोअर कमिटी बरखास्त करायची होती का? असा प्रश्न विचारला असता, अण्णा म्हणाले की, मी अशा कोणत्याच प्रकारची माहिती ब्लॉगवर दिली नव्हती वा प्रसिद्ध केली नव्हती, मात्र त्याच विधानावर राजू परुळेकर यांनी शनिवारी खुलासा करत २३ ऑक्टोबरला अण्णांनी मराठीत लिहिलेले पत्र ब्लॉगवर अपलोड करून आपले मत मांडले आहे. ते म्हणाले की, २३ ऑक्टोबरला अण्णांनी आपल्या हस्ताक्षरांनी लिहिलेला ब्लॉग माझ्याकडे सोपवला. त्यात अण्णांनी केजरीवाल, भूषण आणि बेदी यांच्यापासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला होता. परंतु अण्णांचे सहकारी सुरेश पठारे यांनी तो ब्लॉग प्रसिद्ध करण्यास नकार दिल्यानंतर मी तो प्रसिद्ध केला नाही. परुळेकर यांनी आरोप लावला आहे की, केजरीवाल, प्रशांत आणि बेदी यांच्या कामापासून नाराज होते व ते अण्णांच्या विचारांच्या विरोधात काम करत होते. आश्चर्याची गोष्ट अशी की, परुळेकर यांनी ब्लॉगवर अपलोड केलेल्या पत्रात केजरीवाल, बेदी आणि भूषण यांच्या नावाचा उल्लेख नसल्याचे सिद्ध झाले आहे. त्यात अण्णांनी फक्त मी लवकरच कोअर कमिटीची पुनर्निर्मिती करणार असल्याचे मत मांडले आहे.